# Government Of Maharashtra
महाराष्ट्र शासन
Office of the Joint 9Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai
उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.
विकास सेटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.
Tel.No. 25206199/25208182 Email: didic.mumbai@maharashtra.gov.in


दिनांक :- २९.०८.२०२३.

सा द र :-

मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्याकरिता झालेल्या एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई उपनगरकरिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक ०८.०८.२०२३ चे इतिवृत्त मान्यतेस्तव व स्वाक्षरीकरिता सादर,

उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती


जिल्हाधिकारी मुंबई उपनगर
3169
11 SEP 2023
13/9/23

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**Government Of Maharashtra**

**महाराष्ट्र शासन**

**Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**

**उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,**

**Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.**

**विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.**

**Tel.No. 25206199/25208182** **Email: didic.mumbai@maharashtra.gov.in**

**दिनांक :- २९.०८.२०२३.**

## :- मुंबई उपनगर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक ०८.०८.२०२३ चे इतिवृत्त -:

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबत, शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक निप्रप-२०२०/ प्र.क्र. २८/ उद्योग-७, दिनांक १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आल्यानुसार मुंबई उपनगराकरिता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आले आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व उद्योजकांना येणा-या अडचणीचे निराकरण करण्याकरिता तसेच जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई उपनगराकरिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०८.०८.२०२३ रोजी दुपारी ०३.३० वाजता मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकीय भवन, ९ वा माळा, वांद्रे (पूर्व), मुंबई. ४०० ०५१. येथे संपन्न झाली.

१. सर्वप्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करुन निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई उपनगर जिल्हयाकरिता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत निर्यातवाढीकरिता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित निर्यातसंबंधी इत्यादी काही अडचणी असल्यास त्याबाबत कळविण्याबाबत निर्देश दिले.

२. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

| क्रमांक | विषय | उपस्थित केलेले मुद्दे | मा. अध्यक्षांनी दिलेले निर्देश |
|---|---|---|---|
| १. | Capacity Building Programme (क्षमता विकास कार्यक्रम) | निर्यातदारांच्या क्षमताबांधणीसाठी येणाऱ्या खर्चास जिल्हा नियोजन समितीमार्फत मान्यता देण्यात आली असून तसा प्रस्ताव या कार्यालयामार्फत मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे मान्यतेकरिता सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त होताच जिल्हा नियोजन समितीकडे निधी मागणी करण्यात येऊन EPC यांचे मदतीने निर्यातदारांचे क्षमता वृध्दीसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात येतील. | मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचेकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करुन जिल्हा नियोजन समिती यांचेकडे त्वरीत निधी मागणी करण्यात यावी. |
| २. | Leather Cluster/Leather HUB | मुंबई उपनगर जिल्हयाकरिता धारावी भागात Leather Product मोठया प्रमाणात उत्पादन होत असून मोठया प्रमाणात निर्यात होत आहे. याबाबत लिडकॉम चे अधिकारी यांचेकडून सांगण्यात आले की, लिडकॉमतर्फे जिल्हयात Leather CFc करण्याचे प्रस्तावित आहे व लिडकॉमची जागा देवनार येथे आहे. परंतु शासनाकडून अद्याप लिडकॉमचे नांवे जागा हस्तांतरण झालेले नसून याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे आहे. याबाबत सदस्य सचिव यांनी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत उपलब्ध करुन दिल्यास जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. | मा. अध्यक्ष यांनी लिडकॉमच्या जागा हस्तांतरणाबाबतच्या प्रस्तावाची प्रत उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत व उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग यांनी याबाबत प्रस्ताव तयार करुन जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले. |
| ३. | जिल्हा निर्यात प्रचालन कक्ष स्थापन करणे. | सदस्य सचिव यांनी जिल्हा निर्यात वाढीकरिता उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग कार्यालयात जिल्हा निर्यात प्रचालन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. | मा. अध्यक्ष यांनी सदरबाबतची माहिती औद्योगिक संघटना, निर्यात प्रचालन परिषद यांना देण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. |
| ४. | भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ) यांचेमार्फत उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग कर्मचारी यांना निर्यातीविषयक प्रशिक्षण देण्याबाबत. | याबाबत भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ) यांनी कार्यवाही करण्याबाबतचे नियोजन उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभागास सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. | मा. अध्यक्ष यांनी चर्चा केल्यानुसार कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. |
| ५. | सर्व निर्यात प्रचालन परिषदांनी Buyer and Seller Data सादर करण्याबाबत. | जिल्हा निर्यात प्रचालन कक्षात अद्ययावत माहिती तयार करण्याकरिता त्यांचेकडील Buyer and Seller Data पुरविण्यात यावा तसेच पुढील आर्थिक वर्षातील कार्यक्रमांची माहिती सादर करण्यात यावी. | मा. अध्यक्ष यांनी चर्चा केल्यानुसार कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. |

मुंबई उपनगराकरिता प्रस्तावित निर्यात प्रचालन समिती बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कार्यवाही होण्याकरिता सदस्य सचिव यांनी मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे निर्देशानुसार जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दरमहा घेण्यात येणार असल्याचे मा. अध्यक्ष यांना सांगण्यात आले.

तसेच सदर समिती अंतर्गत निर्यातीसंदर्भात बैठकीस उपस्थित असलेल्या संस्थेस तसेच इतर अन्य संस्थेस काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करणे व त्याबाबत माहिती उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

- <u>बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य :-</u>

| | |
|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| २. | उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| ३. | उद्योग अधिकारी (मुंप्रावि), जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| ४. | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया,बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, २ रा मजला, नटराज मार्केटसमोर, एस.व्ही.रोड, मालाड (पश्चिम), मुंबई. |
| ५. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. |
| ६. | वरिष्ठ प्रकल्प सल्लागार, अर्न्स्ट अँड यंग एलएलपी, ५ वा मजला, ब्लॉक बी, निरलॉन नॉलेज पार्क, गोरेगांव, मुंबई. |
| ७. | संचालक, जेम्स अँड ज्वेलरी एक्सपोर्ट कौन्सील, ए-डब्ल्यू-१०१०, टॉवर-ए, जी ब्लॉक, भारत डायमंड हाऊस, वांद्रे-कुर्ला संकुल, बीकेसी रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई. ५१. |
| ८. | भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ), टाईम्स स्क्वेअर, युनिट क्रमांक ३-ए, बी विंग, ४ था मजला, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई. ४०००५९. |
| ९. | संचालक, लेदर एक्सपोर्ट कौन्सिल, टार हब इमारत १, युनिट क्रमांक १०२, १ ला मजला, हॉटेल हयात रिजेन्सी जवळ आणि आयटीसी मराठा सहार आंतरराष्ट्रीय विमानतळ रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई. ४०००९९. |
| १०. | लेदर इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कार्पोरेशन, ४५, ५ वा मजला, बॉम्बे लाईफ बिल्डींग, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई. ४००००१. |

क्रमांक उससं/मुंप्रावि/मुंबई उपनगर/जिनिप्रस/बैठक/२०२३/ दिनांक :-

प्रत माहितीस्तव सादर :-
१. मा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
२. बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य, मुंबई उपनगर.